# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २३/०१/२०२५ (गुरूवार) सायंकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन वेलतूर** :—दिनांक २२/०१/२०२५ रोजी पोस्टे वेलतूर येथील स्टाफ पोस्टे हददीत पेट्रोलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा देवळीकला येथे ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा देवळीकला येथे लाल रंगाचा आयशर ४८० कंपणीचा ट्रॅक्टर क्र. एम एच—४० सी एच ७७९३ व विना क्रमांकाची ट्रॉली हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रॅक्टर चालक आरोपी नामे अतुल रामाजी बोंदरे वय २४ वर्ष, रा. आमटी ता. कुही जि. नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच रेतीची वाहतुक लाल रंगाचा आयशर ४८० कंपणीचा ट्रॅक्टर क्र. एमएच—४० सी एच ७७९३ व विना क्रमांकाची ट्रॉली चा मालक प्रविण महादेव इटनकर वय ३६ वर्ष, रा. देवळीकला ता. कुही जि. नागपुर यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर मधुन १) १ ब्रास रेती किंमती ५००० /— रूपये आणि २) लाल रंगाचा आयशर ४८० कंपणीचा ट्रॅक्टर क्र. एम एच—४० सी एच ७७९३ किंमती ६,००,०००/—रू. असा एकुण ६,०५०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

ट्रॅक्टर चालक **आरोपी नामे १) अतुल रामाजी बोंदरे वय २४ वर्ष, रा. आमटी ता. कुही जि. नागपुर मालक २) प्रविण महादेव इटनकर वय ३६ वर्ष, रा. देवळीकला ता. कुही जि. नागपुर** याच्या विरूध्द पोस्टे वेलतूर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.स. सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधि. १९५७ सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक तसेच शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीताविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे उमरेडः—** दिनांक २१/०१/२०२५ रोजी यातील फिर्यादी हे मंडळ अधिकारी या पदावर कार्यरत असुन त्यांना मिळालेल्या गोपनीय माहिती वरून आरोपी चालक क्र. **१) नागेश सुरेशराव बावणकर रा. कावरापेठ उमरेड व २) संकेत नरेंद्र मेश्राम वय २० वर्ष रा. चिमुर जि. चंद्रपूर** हे वाहन क्र. एम.एच. ४०/सी टी ९८८९ ने कळमना चौक उमरेड येथे अवैध रेती वाहतूक करताना आढळून आले. सदर वाहनाची तपासणी केली असता वाहन चालकाजवळ रेती वाहतूकीचा परवाना नसल्याने वाहन चालकासह पुढील कार्यवाही करिता तहसिल कार्यालय येथे आणत असता वाहन मालक व ड्रायव्हर यांनी जोरजबरदस्ती करून वाहनातील रेती गांगापूर रोडवर पाडत कळमना चौक येथे भरलेले वाहन खाली करून वाहनासह पळून गेला व बाबा सावजी हॉटेल समोर लावलेली बॅरिकेट याला धडक देवून आपले वाहन वेगाने पळवून नेण्याचा प्रयत्न केला व सरकारी कामात अडथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी फिर्यादी मधुकर संपतराव वाघ, वय ५५ वर्ष, रा. परसोडी उमरेड यांचे रीपोर्ट वरून पोस्टे उमरेड येथे आरोपीतांविरूद्ध कलम १३२, १२५, ३०३ (२) ए ३(५) बीएनएस, १८४ मोवाका ४८(७), (८) म.ज.म.संहिता १९६६, ४, २१ खाण आणि खनिज अधि १९५७, ३ सार्व. संपत्ती प्रति. अधि. १९८४, १५ पर्यावरण अधि. १९८६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैध घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे नरखेडः— दिनांक २२/०१/२०२५ रोजी पोस्टे नरखेड येथील स्टाफ पोलीस ठाणे परीसरात पेट्रोलींग करीत असता मूखबीरद्वारे विश्वसनिय माहीती मिळाली की पिपळा केवळराम येथील गिरीश सातपूते नावाचा ईसम हा त्याचे केवळराम पिपळी ते नांदागोमुख रोडने असलेल्या शेतातील गोठ्यात लोखंडी धारदार हत्यार (तलवार) बाळगून आहे या माहीतीवरून पिपळा केवळराम येथील शेतातील एका टीनाचे गोठ्याजवळ एक ईसम दिसला त्याला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव गिरीश शामराव सातपूते वय ३७ वर्ष रा. पीपळा केवळराम ता. नरखेड असे सांगीतले यावरून संशय आल्याने त्याचे गोठ्याची झडती घेतली असता त्याचे शेतातील टिनाचे गोठ्यात असलेल्या पलंगाचे खाली एक लोखंडी तलवार जुनी वापरती ज्याचे वर्णन एक लोखंडी तलवार जिचा एकीकडील पात्याचा भाग धारदार असून दुसरा भाग बोथड जीची एकूण लांबी ९० सेंमी ज्यामध्ये मूठ १४ सेमी व पाते ७६ सेंमी व मधोमध पात्याची रूंदी ४ सेंमी कीमती १५० रू. ची मिळून आल्याने ताब्यात घेवून जप्त करण्यात आली. आरोपी नामे गिरिश शामराव सातपुते वय ३६ वर्ष रा. पिपळा केवळराम ता. नरखेड हा आपले ताब्यात धारदार लोखंडी तलवार अवैद्यरीत्या बाळगून लोकांच्या जीवीतास धोका निर्माण करण्याचे उद्देशाने बाळगून मिळून आल्याने आरोपी विरूदध कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका अन्वये गून्हा नोंद केला आहे. आरोपीस नरखेड पोलीसांनी अटक केली आहे.

## जनावरे चोरी करणारे आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

फिर्यादी नामे— कमलाकर दामोदर वेळेकर वय ५२ वर्ष रा. फेटरी याचे कडे ०५ गाई असुन त्या गाई यानी दि. २७/१२/२४ रोजी नेहमीप्रमाणे सर्व गाई फेटरी येथील रोड चा बाजुला बांधलेल्या असताना दिनांक २८/१२/२४ रोजी सकाळी ०७/०० वा पाहीले असता तर एक पांढऱ्या रंगाची गाय किंमती १०,०००/—रू दिसली नाही. आजुबाजुला शिवारात शोध घेतला असता मिळून आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे. अशा फिर्यादीचे रीपोर्ट वरून पोस्टे कळमेश्वर येथे अप. क्र. ३१/२०२५ कलम ३०३ (२) BNS अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत असता दिनांक २२/१/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर अप. क्र. ३१/२०२५ कलम ३०३ (२) BNS चे गुन्हाचे तपासात फिर्यादी कडून प्राप्त माहिती वरून आरोपीचा शोध करीत असता गोपनीय बातमीदाराकडून रेकॉर्ड वरील **आरोपी क्रं १) आदिल जलील कुरेशी वय २८ रा. प्रवेश नगर पिली नदी नागपूर याचे** जवळ गुन्ह्यात वापरलेले वाहंना सारखे वाहन असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने आरोपींचा शोध घेतला असता आरोपी क. १ हा राहते घरी मिळून आल्याने त्याला सदर गुन्ह्याबाबत विचारपूस केली सदर गुन्हा साथीदार यांचे मदतीने जनावर चोरी केल्याची कबुली दिल्याने त्याचे गुन्ह्यातील सह आरोपी क्रं २. निहाज रहमान शेख वय ४० रा. अरविंद नगर पिली नदी नागपूर व ३) शहाबाज शाहजादा कुरेशी वय ३१ रा . मोमिनपुरा नागपूर यांचा शोध करून आरोपी क्र २ ला ताब्यात घेऊन आरोपीतांनी चोरीचें जनावर आरोपी क्रं ४) पाहिजे आरोपी तनवीर खान राहणार पिली नदी नागपूर याला विकल्याचे माहीती दिल्याने गुन्ह्यांत आरोपी कडून वापरलेले वाहन १) एक महिंद्रा लोगण वाहन क्र. MH 27/AC- 7285 की. १,५०,०००/— रू २) नगदी ९०००/— रू असा एकूण मुद्देमाल १,५९,०००रू चा जप्त करण्यात आला आहे. यातील नमूद ०३ आरोपी याची मेडिकल तपासणी करून पो.स्टे. कळमेश्वर यांचे ताब्यात पुढील कार्यवाही कामी देण्यात आले. तसेच गुन्ह्यातील चोरीचे जनावर कापून मास विक्री करुन मिळवलेले नगदी ९०००/—रु मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**उघड गुन्हे**

पो. स्टे. कलमेश्वर अप क्र ३१/२०२५ कलम ३०३(२) BNS

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**